IO

N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
**प्रथम खबर अहवाल**
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** पुणे ग्रामीण **P.S.(ठाणे):** खेड **Year (वर्ष):** 2021

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0393 **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 14/07/2021 22:39 बजे

2. 

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. **(a) Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन

**Time Period (कालावधी):**

**Date From (दिनांक पासून):** 01/07/2021
**Date To ( दिनांक पर्यंत):** 14/07/2021
**Time From (वेळेपासून):** 14:00 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:26 बजे

**(b) Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 14/07/2021 **Time (वेळ):** 22:31 बजे

**(c) General Diary Reference (रोजनामचा संदर्भ**

**Entry No. (नोंद क्र.):** 039 **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 14/07/2021 22:31 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):** पश्चिम, 2 किमी

**Beat No. (बिट क्र.):**

**(b) Address (पत्ता):** जिल्हा सत्र न्यायालय,राजगुरुन

**(c) In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** श्री अनिल निवत्ती बुगदे

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1968 **(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):** **Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) Id details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License,PAN)**
ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No.(अ. | Id Type (ओळखपत्राचा प्रकार) | Id Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**



Scanned with CamScanner

(h) **Address (पत्ता):**

| S.No.(अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | - बी-3 टाईप,बिल्डींग नं 12,पह,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | - बी-3 टाईप,बिल्डींग नं 12,पह,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):** **Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री देवेंद्र मधुकर सोन्नीस | | | 1. रा ठिकम नंबर 10,श्रीपाद अपा,खेड,पुणे ग्रामीण,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. मध्ये)) |
|---|---|---|---|---|

10 **Total value of property (In Rs/-)-(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

11 **Inquest Report / U.D. case No., if any (इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12 **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

मी दि.30/06/2021 रोजी श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांना फोन करुन माझी तक्रार सांगितली. त्यावरुन मला पोलीस उपअधिक्षक श्रीमती पवार लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,पुणे यांचा फोन आला. त्यांना मी माझी तक्रार सांगितली, ती तक्रार लाचेसंदर्भात असल्याची त्याची खात्री झाली. त्यावरुन मी त्यांना दि.01/07/2021 रोजी 09:30 वाजता खेडकडून मंचरकडे जाणारे रस्त्याच्या उजव्या बाजूकडील बंद इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ,खेड नाशिक महामार्ग,खेड,ता.खेड,जि.पुणे येथे येण्यास सांगितले. त्यावरुन दि.01/07/2021 रोजी मी खेडकडून मंचरकडे जाणारे रस्त्याच्या उजव्या बाजूकडील बंद इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ,खेड नाशिक महामार्ग,खेड,ता.खेड,जि.पुणे येथे आलो असता तेथे माझी पोलीस उपअधिक्षक श्रीमती पवार मडम,सापळा पथक व दोन पंच यांचेशी भेट झाली.त्यावेळी त्यंानी त्यांची ओळख मला करुन दिली मी ही माझी ओळख करुन दिली. तसेच माझे अशिल बबन नायकोडी हे माझे सोबत होते त्याची ही ओळख करुन दिली. त्यावेळी मी माझी तक्रार सापळा पथक व दोन्ही पंचासमक्ष कथन केली.ती पुढील प्रमाणे माझे अशिल बाळासाहेब नायकोडी रा.डिंगोरे, जुन्नर,पुणे यांचेवर ओतुर पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा रजिस्टर नं 261/2021 कलम 304 भा.द.वि. या गुन्हयात अटक झाली आहे. माझे अशिल यांना न्यायालयीन कोठडी झालेली आहे. फौजदारी जामीन अर्ज नंबर 431/2021 व 432/2021 हा जामीन अर्ज 10/06/2021 रोजी खेड येथील सेशन कोर्टात दाखल केला.नमुद जामीन अर्जाची सुनावणी मा. जिल्हा न्यायाधिश/सत्र न्यायाधिश श्री.अंबाळकर यांचे कोर्टापुढे सुरु आहे. माझे अशिल बाळासाहेब नायकोडी रा.डिंगोरे, जुन्नर,पुणे यांनी मी व्यवसायिक असल्याने माझी जामीन अर्जाच्या सुनावणीसाठी कायदेशीर मदत घेतली. त्यावरुन मी कायदेशीर वकीलपत्र दाखल केले आहे. या केसमध्ये सुनावणी ही न्यायाधीश श्री अंबाळकर यांच्या कोर्टामध्ये झाली. त्या कोर्टामध्ये सरकारी वकील म्हणून श्री सोनीस हे ओतूर पोलीस स्टेशन मार्फत सरकारचे वकील आहेत. त्या केसमध्ये सरपंच ग्रामपंचायत, डिंगोरे यांनी माझ्या अशिलाला जामीन मंजुर होऊ नये म्हणुन अर्ज दाखल केला आहे. त्याबाबत सरकारी वकील सोनीस यांनी ऑबजेक्शन घेतले नाही. म्हणून सरकारी वकील सोनीस यांचेकडे मी विचारणा केली असता त्यांनी मला सांगीतले की, सदर अर्जावर हरकत घेण्यासाठी व जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी हरकत न घेण्यासाठी व जामीन मिळण्यासाठी मदत करतो म्हणुन माझेकडे दिनांक 23/06/2021 रोजी 5000/- रुपये लाचेची मागणी केली. त्यापैकी नाइलाजास्तव मी त्यांना 1500/- रुपये दिले. उर्वरीत लाच रक्कम 3500/- रुपये दिनांक 01/07/2021 रोजी घेऊन बोलाविले आहे. परंतु त्यांना मला सदरची लाच रक्कम देण्याची ईच्छा नाही. तरी त्यांचेवर आपले विभागाकडुन योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस विनंती आहे. मी कथन केलेली तक्रार व लेखी दिलेली तक्रार एकच असल्याची खात्री झाली,त्यावर पंचानी व पोलीस उपअधिक्षक श्रीमती पवार यांनी सहया केल्या.माझे तक्रारीवरुन पंचासह लाचे संदर्भात पडताळणी करण्याचे ठरले. त्यानंतर माझे व पंचाचे निवेदन घेवुन योग्य त्या सुचना देवुन 10:37 वाजेच्या सुमारास माझे काळे कोटाच्या आतील बाजुस व्हाईस रेकर्डर लावून पंच साक्षीदार श्री विघाटे यांच ेसह लाचेच्या मागणी संदर्भात लोकसेवक श्री.सोनिस सरकारी



Scanned with CamScanner

वकील यांची पडताळणी करणेसाठी, खेड कोर्ट,खेड,जि.पुणे येथे पाठविले. त्यावरुन मी व पंच श्री विधाटे असे खेड कोर्ट येथील दुसरे मजल्यावर जाऊन सरकारी वकील श्री सोनीस यांना भेटलो. त्यावेळी त्याचेत व माझेत जामीन अर्ज नंबर 431/2021 व 432/2021 बाबत चर्चा झाली, त्यावेळी त्यानी माझेकडे जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी हरकत न घेण्यासाठी व जामीन मिळण्यासाठी मदत करतो म्हणुन माझेकडे मागणी केलेल्या 5000/- रुपये लाच रकमेपैकी उर्वरीत 3500/- रुपये लाचेची मागणी केल्याचे व सदरची लाच रक्कम लवकरात लवकर घेऊन येण्यास सांगितले असल्याचे निष्पन्न झाले.त्यावरुन सापळा कारवाई तात्काळ करण्याचे सर्वानुमते ठरले. त्यावरुन सापळा कारवाईसाठी मी माझे कडील 3500/- रुपये दिले. सदर लाच रकमेचे वर्णन नमुद करुन त्या रकमेस अन्थसिन पावडर लावुन ती लाच रक्कम काळे कोटाच्या पुढील डावे खिश्यात ठेवुन, योग्य त्या सुचना देवुन, मला व पंच श्री विधाटे यांना सापळा कारवाईसाठी 11:54 वाजता रवाना केले.माझे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र2 ही आले.खेड न्यायालयाच्या दुसरे मजल्यावर सापळा लावण्यात आला. परंतु लोकसेवक श्री.सोनिस सरकारी वकील, खेड हे पुण्याला गेल्याचे समजले. त्यामुळे सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली. त्यावेळी मी सापळा पथक व पंचाना सांगितले की, दि.06/07/2021 रोजी सदर जामीन अर्जावर सुनावणी आहे,त्या दिवशी सरकारी वकील सोनीस हे येणार आहेत,त्या दिवशी सापळा कारवाई करु असे सांगितले. त्यावरुन दि.06/07/2021 रोजी सापळा कारवाई करण्यात आली. परंतु सरकारी वकील श्री सोनीस हे कोर्टात आले नसल्याने सदरची सापळा कारवाई तामुरती स्थगित करण्यात आली. त्यावेळी मी सापळा पथक व पंचाना सांगितले की दि.08/07/2021 रोजी सरकारी वकील श्री सोनीस येणार आहेत. त्या दिवशी सापळा कारवाई करु असे सांगितले. त्यावरुन दि.08/07/2021 रोजी सापळा कारवाई करण्यात आली. परंतु सरकारी वकील श्री सोनीस हे कोर्टात आले नसल्याने सदरची सापळा कारवाई तात्पुरती स्थगित करण्यात आली.
दिनांक 13/07/2021 रोजी मला समजले की, दि.14/07/2021 रोजी सरकारी वकील श्री सोनीस हे खेड कोर्टात येणार आहेत ती बाब मी पोलीस निरीक्षक श्री सुनिल बिले ला.प्र.वि.पुणे यांना सांगितली. त्यावरुन दि.14/07/2021 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरले.
दिनांक 14/07/2021 रोजी सापळा कारवाई साठी मी सकाळी 12:00 वाजता अमुल दुध डेअरी जवळील सार्वजनिक रस्त्याच्या बाजुस,खेड, जि.पुणे येथे आलो. तेथे सापळा पथक व पंच देखील आले. त्यानंतर माझे व पंचाचे निवेदन घेतले. त्यानंतर मला,पंचाना व सापळा पथकास योग्य त्या सुचना दिल्या. सापळा कारवाईकामी दि.01/07/2021 रोजी दिलेली 3500/-रुपये रक्कम अन्थसिन पावडर लावलेली रक्कम माझे काळे कोटाच्या पुढील डावे खिश्यात ठेवण्यात आली. त्यानंतर व्हाईस रेकर्डर सुरु करुन माझे काळे कोटाचे आत मध्ये लावला.मला व पंच श्री विधाटे यांना सापळा कारवाईसाठी 12.32 वाजता रवाना केले.माझे पाठोपाठ सापळा पथक व पंच क्र2 ही आले.खेड न्यायालयाच्या दुसरे मजल्यावर सापळा लावण्यात आला. त्यानंतर अर्धा तासानी माझी सरकारी वकील सोनीस यांचेशी भेट झाली. त्यावेळी त्यांचेत व माझेत जामीन अर्ज नंबर 431/2021 व 432/2021 बाबत चर्चा झाली. त्यावेळी त्यानी माझेकडे जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी जामीन मिळण्यासाठी मदत केली आहे,असे म्हणुन उर्वरीत 3500/- रुपये लाच रक्कम मागितली. मी माझे काळे कोटाच्या पुढील डावे खिशातुन 3500/- रुपये सरकारी वकील सोनीस यांना दिले असता त्यांनी उजवे हातानी सदरची लाच रक्कम स्विकारली. त्यावेळी मी सापळा पथकास पुर्वनियोजीत इशारा करुन सरकारी वकील श्री सोनीस यांनी लाच रक्कम स्विकारले असल्याचे संागीतले.त्यावेळी सापळा पथकानी तात्काळ सरकारी वकील सोनीस यांना 13.26 वाजता रंगेहात खेड कोर्टाच्या इमारती खालील पुर्वेकडील पार्किंग जवळील रस्त्यावर,खेड,ता.खेड,जि.पुणे येथे पकडले व त्याचेकडील लाचेची रक्कम हस्तगत केली. पंचासमक्ष सरकारी वकील सोनीस यांना त्यांचे पुर्ण नाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव श्री देवेंद्र मधुकर सोन्नीस वय 57 वर्षे,पद-अतिरीक्त सरकारी अभियोक्ता,अतिरीक्त सत्र न्यायालय, खेड, ता. खेड, जि. पुणे,रा. ठि.रुम नंबर 10,श्रीपाद अपार्टमेन्ट,मारुती मंदीराशेजारी,औंध गाव,ता.हवेली,जि.पुणे असे सांगितले. सदर घटनेबाबतचा सविस्तर पंचनामा खेड पोलीस ठाणे येथे करण्यात आला आहे.एकंदरीत दिनांक 01/07/2021 रोजीच्या माझ्या तक्रारीच्या अनुषंगाने पंचासमक्ष दि.01/07/2021,दि. 06/07/2021,दि.08/07/2021 व दि.14/07/2021 रोजी करण्यात आलेली पडताळणी व सापळा कारवाई दरम्यान घडलेल्या घटना तसेच प्रत्यक्ष लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडुन ध्वनीमुद्रीत झालेले संभाषण यावरुन लोकसेवक श्री देवेंद्र मधुकर सोन्नीस वय 57 वर्षे,पद-अतिरीक्त सरकारी अभियोक्ता,अतिरीक्त सत्र न्यायालय,खेड,ता.खेड,जि.पुणे यांनी जामीन अर्ज नंबर 431/2021 व 432/2021 बाबत चर्चा करुन, जामीन अर्जाच्या सुनावणी वेळी हरकत न घेण्यासाठी व जामीन मिळण्यासाठी मदत करतो म्हणुन 5000/- रुपये लाच रकमेपैकी उर्वरीत 3500/- रुपये लाच मागणी दिनांक 01/07/2021 रोजी करुन ती दिनांक 14/07/2021 रोजी 13.26 वाजता 3500/- रुपये लाच रक्कम खेड कोर्टाच्या इमारती खालील पुर्वेकडील पार्किंग जवळील रस्त्यावर,खेड,ता.खेड,जि.पुणे येथे स्विकारुन गुन्हेगारी स्वरूपाचे कृत्य केले म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशीर फिर्याद आहे,

**13. Action** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at**
**(केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

**(1) Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):** shatishkumar vilasrav gurav(I (Inspector)) / **or (किंवा)**

**(2) Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**
**Rank (पद):**
**No.(क्र.):** **to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or (किंवा)**

**(3) Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with CamScanner

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14. **Signature/Thumb impression of the complainant / informant.**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

14/07/2021

15. **Date and time of dispatch to the court** (न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस ठाणे अंमलदार
खेड पोलीस स्टेशन

**Signature of Officer in charge, Police Station** (ठाणे प्रभारी अधिका-याची

**Name** (नाव): shatishkumar vilasrav gurav
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):

सदरची प्रथम खबर अहवाल प्रत
प्राप्त झाली आहे.

14/7/2021
(Ad. Anil Byde)



Scanned with CamScanner